महत्त्वाचे

## नीट, जेईईसाठी आढावा घेणार : रमेश पोखरियाल



**नवी दिल्ली** : वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा नीट आणि जेईईचे आयोजन करण्याबाबतचा आढावा एका समितीच्या माध्यमातून घेतला जाईल, अशी माहिती केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनी आज गुरुवारी दिली. जुलैमध्ये या परीक्षांचे आयोजन करण्याबाबत पाल्य आणि पालकांनी काळजी व्यक्त केली आहे. सध्याची परिस्थिती तसेच जेईई आणि नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी केलेली विनंती लक्षात घेऊन, राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए) व इतर तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती परिस्थितीचा आढावा घेऊन लवकरच शिफारसी सादर करेल, असे त्यांनी सांगितले. वैद्यकीय प्रवेशासाठी नीट परीक्षा २६ जुलै, तर अभियांत्रिकी प्रवेशासाठी जेईई परीक्षा १८ ते २३ या कालावधीत निश्चित करण्यात आल्या होता.

## सीए परीक्षेच्या शक्यतेबाबत मूल्यांकन होणार

**नवी दिल्ली** : २९ जुलै ते १६ ऑगस्ट या कालावधीत निर्धारित सीए परीक्षेच्या शक्यतेबाबत मूल्यांकन करू, अशी माहिती 'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया'ने (आयसीएआय) सर्वोच्च न्यायालयाला आज गुरुवारी दिली. देशभरात कोरोनाचा प्रकोप अद्यापही सुरूच असल्याने परीक्षा आयोजनाच्या मुद्यावर राज्ये आणि परीक्षा केंद्रांसोबत सल्लामसलत केली जाईल, असेही या संस्थेने स्पष्ट केले आहे. देशात कोरोना संसर्ग वाढत आहे आणि हा संसर्ग रोखण्यासाठी काही राज्यांनी निर्बंध वाढवले आहेत, असे आयसीएआयच्या वकिलाने न्या. अजय खानविलकर प्रमुख असलेल्या न्यायासनास सांगितले. परीक्षा केंद्रांसोबत संपर्क साधून प्रत्यक्ष परिस्थितीचा अंदाज घेत, सीए परीक्षा घेण्याच्या शक्यतेचे मूल्यांकन करण्यासाठी काही अवधी दिला जावा, अशी मागणी या विधिज्ञाने न्या. दिनेश माहेश्वरी आणि न्या. संजीव खन्ना यांचाही समावेश असलेल्या न्यायासनाकडे केली.

# मध्यप्रदेशात २८ नवे मंत्री

### २० कॅबिनेट, ८ राज्यमंत्री

◆ **भोपाळ, २ जुलै**

मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या कॅबिनेट मंत्रिमंडळाचा आज गुरुवारी विस्तार करण्यात आला. आज मंत्रिपदाची शपथ घेतलेल्या २८ आमदारांपैकी १२ पेक्षा अधिक ज्योतिरादित्य शिंदे यांचे निकटवर्तीय आहेत. या आमदारांनी ज्योतिरादित्य शिंदे यांच्यासोबत भाजपात प्रवेश केला होता.

मध्यप्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी राजभवन येथे झालेल्या कार्यक्रमात आमदारांना मंत्रिपदाची शपथ दिली. या शपथविधीवेळी भौतिक दूरतेसह कोरोनाबाबत जारी करण्यात आलेल्या दिशानिर्देशांचे पालन करण्यात आले. नव्या मंत्र्यांमध्ये २० कॅबिनेट, तर ८ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. या नवीन मंत्र्यांसह चौहान मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या ३४ झाली आहे. काँग्रेसच्या २२ आमदारांनी केलेल्या बंडखोरीमुळे कमलनाथ सरकार कोसळल्यावर त्यांनी २३ मार्च रोजी चौथ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती.



मध्यप्रदेशातील सध्याच्या भाजपा सरकारचे शिल्पकार खासदार ज्योतिरादित्य शिंदे, गुरुवारी नव्या मंत्र्यांच्या शपथविधी समारंभास उपस्थित राहून राजभवनातून बाहेर पडताना.

मध्यप्रदेश मंत्रिमंडळाचा हा दुसरा विस्तार आहे. २१ एप्रिल रोजी पहिला विस्तार करीत पाच मंत्र्यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला होता. यामध्ये ज्योतिरादित्य शिंदे यांचे दोन निकटवर्तीय आमदार तुलसी सिलवट आणि गोविंदसिंह राजपूत यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला होता. सभागृहातील आमदारांची एकूण संख्येच्या ३५ टक्के मंत्रिमंडळ असते. या नियमाआधारे चौहान यांच्या मंत्रिमंडळात अद्याप एक मंत्रिपद शिल्लक आहे.

आजच्या मंत्रिमंडळ विस्तारात भाजपाचे माजी मंत्री गोपाल भार्गव, विजय शाह, जगदीश देवडा, यशोधराराजे शिंदे, भूपेंद्रसिंह, ब्रजेंद्र प्रतापसिंह आणि विश्वास सारंग यांचा समावेश आहे. ज्योतिरादित्य शिंदे यांच्या गटातील बिसाहुलालसिंह, ऐदलसिंह कासाना इमरती देवी, प्रभुराम चौधरी, महेंद्रसिंह सिसोदिया, प्रद्युम्नसिंह तोमर, हरदीपसिंह डांग, राजवर्धनसिंह दत्तीगाव यांचा समावेश मंत्रिमंडळात करण्यात आला. या व्यतिरिक्त ब्रजेंद्रसिंह यादव, गिरीराज दंदोटिया, सुरेश धाकड आणि ओ. पी. एस. भदोरिया यांनी राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली. भाजपाच्या प्रेमसिंह पटेल, ओमप्रकाश साकलेचा, ऊषा ठाकूर, अरविंद भदोरिया आणि मोहन यादव यांना कॅबिनेट, तर भरतसिंह कुशवाह, इंदरसिंह परमार, रामखेलावन पटेल आणि राम किशोर कावरे यांनी राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली. *(वृत्तसंस्था)*

# आफ्रिकेतील तलावाजवळ आढळले ३५० हत्तींचे मृतदेह

◆ **गॅबोरोनो, २ जुलै**



आफ्रिका खंडातील बोत्स्वाना देशात तलाव, पाणवठ्याजवळ ३५० हत्तींचे मृतदेह आढळून आले आहेत. हे मृतदेह तलाव, पाणवठ्याजवळ आढळून आल्यामुळे हा घातपाताचा प्रकार असावा, अशी शक्यता आहे. त्याशिवाय हा एखादा आजार आहे का, याचाही तपास करण्यात येत आहे. बोत्स्वाना सरकारने या मुद्यावर अद्यापही अधिकृत प्रतिक्रिया दिली नाही. मात्र, हस्तिदंतासाठी विष देऊन हत्तींना ठार मारण्याचा प्रकार झिम्बाब्वेमध्ये समोर आला होता. नॅशनल पार्क संवर्धनाचे डॉक्टर नील मॅकेन यांनी गार्डियनला सांगितले की, इतक्या मोठ्या संख्येने हत्तींचा मृत्यू कधी झाला नाही. दुष्काळादरम्यान असे मृत्यू होतात. मात्र, सध्या पाणीदेखील उपलब्ध आहे.

बोत्स्वाना सरकारने या प्रकरणी मौन बाळगले असले तरी हत्तींच्या मृत्यूची चौकशी सुरू केली आहे. काही नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून त्यांचा अहवाल येणे बाकी आहे. आफ्रिका खंडातील एकतृतीयांश हत्तींची संख्या ही बोत्स्वाना देशात आहे. हेलिकॉप्टरद्वारे सर्वेक्षण करणाऱ्या पथकाला १६९ मृतदेह आढळले आहेत. मात्र, मॅकेन यांनी सांगितले की, पथकाला आढळलेल्या मृतदेहांची संख्या ही ३५० हून अधिक आहे. विशेष म्हणजे फक्त हत्तींचेच मृतदेह आढळत असून इतर कोणत्याही प्राण्याचे मृतदेह आढळले नसल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. मॅकेन यांनी सांगितले की, जर हा प्रकार अवैध शिकार करण्याचा असता तर इतरही प्राण्यांचे मृतदेह आढळले असते. त्याशिवाय पाण्यात विष कालवले असते तर इतरही प्राणी मृत्युमुखी पडले असते. त्यामुळे या मृत्यूंमागे एखादा आजार असण्याची शक्यता आहे. अनेक हत्ती हे तोंडाच्या भागावर पडले असल्याचे आढळून आले आहे. हे एखाद्या विषप्रयोगाचे लक्षण आहे. मात्र, प्रयोगशाळेतील अहवाल आल्यानंतरच यावर अधिक भाष्य करता येईल, असेही त्यांनी सांगितले. या मृत्यूंमागे माणसांमधून हत्तींमध्ये संक्रमित झालेला एखादा आजारही असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. बोत्सवानाचे राष्ट्रीय उद्यान विभागाचे कार्यवाह संचालक डॉ. साइरील टोलो यांच्या माहितीनुसार, आतापर्यंत जवळपास २५० हून अधिक हत्तींचा मृत्यू झाला आहे. इतर प्राण्यांबाबतही माहिती जमवण्याचे प्रयत्न केले जात असल्याचीही माहिती त्यांनी दिली. *(वृत्तसंस्था)*

# चिंगारी ॲपचे संकेतस्थळ हॅक

◆ **नवी दिल्ली, २ जुलै**

भारत सरकारकडून ५९ चीनी ॲप्सवर बंदी घातल्यानंतर आता या यादीत शॉर्ट व्हिडीओ मेकिंग ॲपच्या जागी इंडियन ॲप्स वेगाने प्रसिद्ध होत आहेत. यातीलच एक म्हणजे चिंगारी ॲप आहे. या ॲपच्या वेबसाईट सोबत छेडछाड झाल्याचा आणि हॅकिंग झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. चिंगारी ॲपला ऑपरेट करणारी कंपनी ग्लोबुससॉफ्ट वेबसाईटच्या कोड्समध्ये बदल करण्यात आल्याची माहिती समोर आली. कंपनी वेबसाईटच्या सर्व पेजेसमध्ये एक स्क्रीप्ट ॲड करण्यात आली आहे. ज्यात मॅलिशस कोडचा समावेश होता.

याच्या मदतीने वापरकर्त्याला वेगवेगळ्या वेबसाइट्सवर रिडायरेक्ट केले जाऊ शकते. लोबुससॉफ्ट वेबसाइटची कमतरता सिक्योरिटी रिसर्चर एलियट एल्डरसनने माहिती काढली आहे. याआधी एलियटकडून आरोग्य सेतू ॲपच्या एका प्रायव्हसी संबंधी माहिती देण्यात आली होती.

चिंगारी ॲपचे सह संस्थापक सुमित घोष यांनी याप्रकरणी बोलताना सांगितले आहे की, लोबुससॉफ्ट हा ॲपचा एक भाग असला तरी



वापरकर्त्याला कोणत्याही प्रकारे नुकसान पोहोचू शकत नाही. ॲप फाउन्डर सुमित घोष यांच्या माहितीनुसार, वेबसाइटवर सध्या जी समस्या येते आहे. तो लवकर निकाली काढली जाईल. लोबुससॉफ्ट वेबसाइट आणि चिंगारी ॲप दोन्ही सिक्योरिटी आणि इंजिनीयरिंग टीम वेगवेगळी आहेत. चिंगारी लवकरच एक स्वतंत्र कंपनी बनणार आहे. बाजारात येण्याआधी १५ दिवसात या ॲपला १० लाखांहून अधिक वेळा इन्स्टॉल करण्यात आले आहे. टिकटॉकवर बंदी घातल्यानंतर हे ॲप टॉप चार्ट्समध्ये पोहोचले आहे. *(वृत्तसंस्था)*

# देशात कोरोना संक्रमितांची संख्या ६ लाखांच्या वर

◆ **नवी दिल्ली, २ जुलै**

गेल्या २४ तासात १९१४८ नवे रुग्ण सापडल्यामुळे देशातील कोरोना संक्रमितांची संख्या ६ लाखाच्या वर गेली आहे. यावेळी आतापर्यंतच्या सर्वात कमी म्हणजे ५ दिवसात संक्रमितांची संख्या १ लाखाच्या वर गेली आहे.

१९१४८ नव्या रुग्णांमुळे देशातील कोरोना संक्रमितांची संख्या ६ लाख ४ हजार ६४१ झाली आहे, तर ४३४ जणांच्या मृत्युमुळे देशातील कोरोनाबळींची संख्याही १७,८३४ वर पोहोचली आहे.

गेल्या २४ तासात ११,८८१ रुग्ण बरे झाल्यामुळे देशात आतापर्यंत बरे झालेल्या रुग्णांची संख्या ३ लाख ५९ हजार ८५९ झाली आहे. ५९.५२ टक्के आहे. प्रत्यक्ष संक्रमितांच्या संख्येपेक्षा देशात बरे झालेल्या रुग्णांचे प्रमाण दीडपटीने जास्त आहे. याच काळात देशात दररोज १० हजाराच्या गतीने कोरोनाचे रुग्ण बरे झाले आहेत. देशातील प्रत्यक्ष संक्रमितांची संख्या २ लाख २६ हजार ९४७ आहे. कोरोना संक्रमितांचा पहिला १ लाखाचा आकडा गाठायला ११९ दिवस लागले होते. नंतर १५ दिवसांत हा आकडा एक लाखावरून २ लाखावर गेला. १० दिवसांत २ लाखावरून ३ लाखापर्यंत मजल मारली गेली. ८ दिवसांत ३ लाखावरून ४ लाखापर्यंत संक्रमितांची संख्या पोहोचली. ४ लाखावरुन पाच लाखापर्यंत जायला सहा दिवस तर ५ लाखावरुन ६ लाखापर्यंत पोहोचायला फक्त पाच दिवस लागले. महाराष्ट्रात गेल्या २४ तासांत ५५३७ नवे रुग्ण सापडल्यामुळे राज्यातील संक्रमितांची संख्या १ लाख ८० हजार २९८ झाली आहे. १९८ नव्या मृत्युमुळे कोरोनाबळींची संख्या ८०५३ वर पोहोचली आहे. देशात दुसऱ्या स्थानावर असलेल्या तामीळनाडूतील संक्रमितांची संख्या ९४०४९ झाली आहे. *(तभा वृत्तसेवा)*

**कोरोना : सद्य:स्थिती**

| | एकूण बाधित | बरे झाले | मृत्यू |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १,८०,२९८ | ९३,१५४ | ९,०५३ |
| भारत | ६,०४,६४१ | ३,५९,८५९ | १७,८३४ |
| विश्व | १,०८,५०,२४५ | ६०,६७,७२२ | ५,१९,९८० |

# 'टिकटॉक स्टार'च्या दोन्ही महिला रडल्या

◆ **धुळे, २ जुलै**

दोन बायकांसोबत शेतामध्ये नृत्य करणारे व्हिडीओ टिकटॉकवर अपलोड करून रातोरात स्टार झालेल्या अस्सल मराठमोळ्या कलाकाराला टिकटॉक बंद पडल्याचा धक्का बसला आहे. टिकटॉक ॲप बंद झाल्याने त्याच्या दोन्ही बायका ढसढसा रडू लागल्या. दिनेश पवार असे या टिकटॉक स्टारचे नाव आहे. त्याने आपल्या दोन्ही बायकांसोबत ९०च्या दशकातील गाण्यांवर नृत्य करतानाचे अनेक व्हिडीओंचे चित्रीकरण करून टिकटॉकवर अपलोड केले. कधी शेतात, कधी रस्त्यावर तर कधी घरामध्ये नृत्य करतानाचे त्यांचे हे व्हिडीओ प्रचंड लोकप्रिय झाले. ग्रामीण लोकेशन्स आणि नृत्याचे कोणतेही प्रशिक्षण न घेता चित्रपटातील नटांप्रमाणे हुबेहुब करण्यात आलेले नृत्य टिकटॉक प्रेमींना खूप आवडले. *(वृत्तसंस्था)*

# जगदीश उपासने प्रसार भारतीच्या निवड मंडळाचे अध्यक्ष

◆ **नवी दिल्ली, २ जुलै**

भारत प्रकाशनचे संचालक आणि ज्येष्ठ पत्रकार जगदीश उपासने यांची प्रसार भारतीच्या निवड मंडळाचे (रिक्रुटमेंट बोर्ड) अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

केंद्र सरकारच्या संयुक्त सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यापेक्षा कमी वेतनमान असलेल्या प्रसार भारतीतील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची जबाबदारी या नव्या निवड मंडळाकडे राहणार आहे. प्रसार भारतीने आपल्या इतिहासात प्रथमच अशा निवड मंडळाची स्थापना केली आहे.



जगदीश उपासने पांचजन्य आणि ऑर्गनायझरचे प्रकाशन करणाऱ्या भारत प्रकाशनचे संचालक आहेत. इंडिया टुडेचे संपादक म्हणून त्यांनी काम केले आहे, तसेच ते दैनिक तरुण भारतचे स्तंभलेखकही आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयातील संयुक्त सचिव सचिव दर्जाचा अधिकारी या नव्या निवड मंडळाचा पदसिद्ध सचिव म्हणून काम पाहणार आहे. मंडळात चार अन्य सदस्यांचीही नियुक्ती करण्यात आली. प्रसार भारतीचे निवृत्त अतिरिक्त महासंचालक (कार्यक्रम) दीपाचंद्रा, प्रसार भारतीचे निवृत्त अतिरिक्त महासंचालक (अभियांत्रिकी) पी. एन. भक्त, सार्वजनिक उपक्रम निवड मंडळाचे सचिव किंबुओंग किपगेन आणि रेलविकास निगम लिमिटेडचे महाव्यवस्थापक (मानव संसाधन) चेतनप्रकाश जैन या चार जणांची मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. *(तभा वृत्तसेवा)*


pnb Housing Finance Limited

Ghar Ki Baat

पंजीकृत कार्यालय : ९ वा मजला, अंतरिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली- ११० ००१
फोन - ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाईट - www.pnbhousing.com
शाखा कार्यालय - ३०१, ३ रा मजला, गुप्ता हाऊस, रवींद्रनाथ टागोर मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर, महाराष्ट्र - ४४०००१
फोन नं. - ०७१२-२५३३४६०, ०७२९१०४२१४६, ०९९७५४३०९१५, ई-मेल : nagpur@pnbhousing.com, संकेतस्थळ : www.pnbhousing.com

परिशिष्ट-४-अ

**सार्वजनिक सूचना - अचल संपत्तीचा ई-लिलाव व विक्री**

नियम ८(६) व अपेंडीक्स IV-अ च्या तरतुदी प्रमाणे अचल संपत्तीच्या विक्री करिता ई-लिलाव व विक्री सूचना (आर्थिक संपत्तीचे सिक्युरायटेझेशन व पुनर्बांधनी व सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ अंतर्गत) ह्या तारखेच्या सुधारणे प्रमाणे.

जाहीररीत्या व व्यक्तिश: कॉलम ए मध्ये असलेल्या कर्जदार आणि जामीनदार यांना सूचित करण्यात येते की, कॉलम डी मध्ये नमूद केलेली अचल संपत्ती ही सुरक्षित धनकोकडे गहान ठेवलेली/आकारलेली आहे, ती पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पीएनबी एचएफएल) च्या सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्यांद्वारा (कॉलम सी मध्ये सूचित केल्याप्रमाणे) विधायक/शारीरिक ताबा घेतलेला आहे आणि त्या संपत्तीची ''जशी आहे तशी, जी आहे त्याच आणि जिथे आहे त्याच'' तत्त्वावर खाली दिल्याप्रमाणे कर्ज खात्याच्या थकीत रकमेच्या वसुलीकरिता विक्री करण्यात येत आहे.
प्रतिभूती व्याज नियम कायदा २००२ मधील सुधारणांप्रमाणे त्याच्या नियम ८ (६) व ९ अंतर्गत कॉलम ए मध्ये दिल्याप्रमाणे कर्जदार/हमीदार/वारसदार, कायदेशीर प्रतिनिधी, (माहीत असलेला किंवा नसलेला), व्यवस्थापक, प्रशासक, उत्तराधिकारी, संबंधित कर्जदाराने/गहाणदाराने निर्धारित केलेल्या व्यक्तीला (जर जिवंत नसल्यास) ही सूचना देण्यात येत आहे.
विक्रीच्या इतर विस्तृत नियम व अटींकरिता कृपया पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडने (पीएनबीएचएफएल) दिलेल्या अर्थात सुरक्षित धनकोने दिलेल्या संकेतस्थळावर म्हणजेच www.pnbhousing.com वर बघावे.

| कर्ज क्र. कर्जदार/सहकर्जदार/हमीदार/कायदेशीर वारसाचे नाव (अ) | मागणी रक्कम व तारीख (ब) | संपत्ती ताबा स्वरूप (क) | गहाण संपत्तीचे वर्णन (ड) | राखीव किंमत (आरपी) (ई) | अनामत रक्कम आरपीच्या १० टक्के (एफ) | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख (जी) | निविदा दस्तावेज शुल्क (एच) | पाहणीची तारीख व वेळ (आय) | लिलावाची तारीख व वेळ (जे) | अडथळ्यांची माहिती /न्यायालयीन खटले (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ एनएचएल/एनएजी/१२१७/ ४६४२०५ श्री. नामेश रामचंद्रन श्रीमती पी. प्रमला नामेश रामचंद्रन, घर क्र.३६८, बाबा बुद्धनगर, होप हॉस्पिटलजवळ, कामठी रोड, नागपूर, महाराष्ट्र - ४४००१७, भारत | १८.०१.२०१९ रु. २,५८,४४,२४६.७८ (रु.दोन कोटी अठ्ठावन लाख चौरेचाळीस हजार, दोनशे छेचाळीस व अठ्ठ्यातर पैसे फक्त) १८.०१.२०१९ रोजीचे | (शारीरिक) | निवासी भूखंड क्र. ३७८ न्यू, खसरा क्र. १७३/१ समाज भूषण गृहनिर्माण सहकारी संस्था, बाबा बुधाजी नगर, कामठी रोड, होप हॉस्पिटलच्या मागे, मौजा: नारी, नागपूर. महाराष्ट्र-४४००२६ चा सर्व भाग. २४१.२४५० चौरस मीटरचा परिसर | रु. १,२०,००,०००/- (रु. एक कोटी वीस लाख फक्त) | रु. १२,००,०००/- (रु. बारा लाख फक्त) | २१.०७.२०२० ५.०० वाजेपर्यंत | रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) | ०८.०७.२०२० ला स. ११ ते सायं. ५ पर्यंत | २२.०७.२०२० ला स.११.०० ते दुपारी २.३० | **माहिती नाही |
| २ एनएचएल/एनएजी/ ०५१८/५२९६२९ श्री. रूपकुमार लकमीचंद वाधवानी, मेसर्स महाराष्ट्र मिरची भंडार, श्रीमती राणीदेवी लकमीचंद वाधवानी, श्रीमती सीमा रूपकुमार वाधवानी. फ्लॅट क्र. ५०२, चैतन्य अपार्टमेंट, क्लार्क टाऊन, कडबी चौक, नागपूर महाराष्ट्र -४४०००४ | २२.०३.२०१९ रु. १,४७,४३,७८२.४६ (रु. एक कोटी, सत्तेचाळीस लाख त्रेचाळीस हजार सातशे ब्यांशी व छेचाळीस पैसे फक्त) १९.०३.२०१९ रोजीचे | (शारीरिक) | संपत्ती क्र. १, फ्लॅट क्र. ए-५०१, नझुल, प्लॉट क्र.०६, पाचवा माळा, चैतन्य अपार्टमेंट क्लार्क टाऊन, कडबी चौक मौजा : वाडपकड, नागपूर, महाराष्ट्र-४४०००४ येथील सर्व तुकडा ११३८.८९ चौरस फूट इतका परिसर | संपत्ती क्र. १ रु. ३८,००,०००/- (रु. अडतीस लाख फक्त) | संपत्ती क्र. १ रु. ३,८०,०००/- (रु. तीन लाख ऐंशी हजार फक्त) | २१.०७.२०२० ५.०० वाजेपर्यंत | रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) | ०८.०७.२०२० ला स. ११ ते सायं. ५ पर्यंत | २२.०७.२०२० ला स.११.०० ते दुपारी २.३० | **माहिती नाही |
| | | | संपत्ती क्र. २, फ्लॅट क्र. ए-५०२, नझुल, प्लॉट क्र.०६, पाचवा माळा, चैतन्य अपार्टमेंट, वॉर्ड क्र. ६२, क्लार्क टाऊन, कडबी चौक, मौजा : वाडपकड, नागपूर, महाराष्ट्र-४४०००४ येथील सर्व तुकडा १४४१ चौरस फूट इतका परिसर | संपत्ती क्र. २ रु. ४२,००,०००/- (रु. बेचाळीस लाख फक्त) | संपत्ती क्र. २ रु. ४,२०,०००/- (रु. चार लाख वीस हजार फक्त) | २१.०७.२०२० ५.०० वाजेपर्यंत | रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त) | ०८.०७.२०२० ला स. ११ ते सायं. ५ पर्यंत | २२.०७.२०२० ला स.११.०० ते दुपारी २.३० | **माहिती नाही |

त्यासोबतच उपरोक्त तारखेनंतरचे व्याज १८ टक्के दराप्रमाणे लागू होईल, आकस्मिक खर्च, शुल्क व इतर आकार इत्यादी देयकाच्या तारखेपर्यंत किंवा माहिती होईपर्यंत आकारण्यात येतील. पीएनबी हाऊसिंग लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीप्रमाणे, वर दिलेल्या अचल/ सिक्युअर्ड ॲसेटसह फक्त कॉलम क्रमांक केमध्ये दिलेल्या संपत्तीला सोडून इतर संपत्तीवर इतर कुठलाही अधिभार/दावे नाहीत. नंतरही हे अधिभार यशस्वी खरेदीदार/बोलीदार त्याच्या/तिच्या बाजूने भरतील. संभाव्य खरेदीदारांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी वरील अधिभाराची चौकशी स्वतंत्रपणे करावी.
१. आजपर्यंत, वरील विवादास्पद आणि विल्हेवाट लावण्याबाबत न्यायालयाने पीएनबीएचएफएल/पीएनबीएचएफएलच्या अधिकृत अधिकाऱ्यांना अचल मालमत्तेची विक्री करण्यास मनाई करणारा कुठलाही आदेश दिलेला नाही.
२. संभाव्य निविदाधारक आणि स्वारस्य असलेले पक्ष स्वतंत्रपणे पार पडलेल्या कार्यवाही इत्यादीची तपासणी करू शकतात, जर काही असेल तर, कॉलम केमध्ये नमूद केलेले असले तरी पीएनबीएचएफएलमध्ये उपलब्ध असलेल्या शीर्षकातील कागदपत्रांच्या शीर्षकापर्यंत मर्यादित नसून, निविदा अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा ऑफर देण्यापूर्वी ते स्वत:चे समाधान करू शकतील.
३. मेसर्स श्रीराम ऑटोमाल इंडिया लिमिटेड (एसएएमआयएल) विक्रेत्याचे नाव हे अधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात मदत करतील. संपत्तीची चौकशी किंवा बोली दस्ताऐवज मिळविण्याकरिता किंवा इतर कुठल्याही प्रश्नाकरिता किंवा पंजिकरणाकरिता लागणाऱ्या कुठल्याही मदतीसाठी तुम्हाला आमच्या विक्री एजंट/ सेवा प्रदाता यांच्याशी फोन क्र. ९६४७९०७५००, दर्या गंज, नवी दिल्ली, ११०००२ व मुख्य अधिकारी (डिजिटल कंन्टेन्ट प्रॉडक्शन सुविधा) एफसी-६, (तिसरा मजला) सेक्टर १६ ए, फिल्म सिटी, नोएडा २०१३०१-(युपी) www.eauctions.samil.in किंवा श्री. लोकेश माहोरे मोबाईल क्र. ७२९१०४२१४६ किंवा श्री. रोशन पाटील मोबाईल क्र. ९९७५४३०९१५ किंवा श्री. इक्बाल आलम मोबाईल क्र. ९९५८१९५४५३ यांचेशी संपर्क करावा किंवा www.pnbhousing.com वर संपर्क करा.

ठिकाण : नागपूर
दि. ०२.०७.२०२०

स्वा/- अधिकृत अधिकारी,
पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड



**Tender Notice**

Government of Maharashtra

**PUBLIC WORKS DIVISION, ACHALPUR**

**NOTICE FOR EMPANELMENT OF FINANCIAL CONSULTANT**
**TENDER NOTICE NO. 2/ADB/ FOR 2020-2021**

**REQUEST FOR EMPANELMENT OF FINANCIAL CONSULTANTS FOR VARIOUS CONSULTANCY SERVICES FOR PROJECTS FUNDED BY ASIAN DEVELOPMENT BANK IN MAHARASHTRA FOR MAXIMUM THREE YEARS**

The Executive Engineer, Public Works Division, Achalpur, is authorised to carry out the Empanelment process for selection of the FINANCIAL CONSULTANT for various Consultancy Services related to projects funded by Asian Development Bank in Maharashtra, for MAXIMUM THREE YEARS. The Executive Engineer, Public Works Division, Achalpur, Phone. No. 07223-220260 (e-mail - achalpur.ee@mahapwd.com) now invites eligible consultancy firms for **REQUEST FOR EMPANELMENT OF FINANCIAL CONSULTANTS FOR VARIOUS CONSULTANCY SERVICES FOR PROJECTS FUNDED BY ASIAN DEVELOPMENT BANK IN MAHARASHTRA FOR MAXIMUM THREE YEARS** from the date of letter of appointment. The details are available in the Tender Notice no. 2/ADB/ FOR 2020-2021 is displayed on P.W.D. Website, **www.mahapwd.com** and **www.mahaetenders.in**

| | | |
|---|---|---|
| 1 | Document Download / Sale Start Date | Dt. 30.06.2020 at 10:00 Hrs. to Dt. 09.07.2020 at 23.30 Hrs. |
| 2 | Bid Submission Start Date to End Date | Dt. 30.06.2020 at 10:00 Hrs. to Dt. 09.07.2020 at 23.30 Hrs. |
| 3 | Submission of Hard Copy E-Tender Document | The Consultant shall submit the hard copy in "Sealed Envelop" of as specified in NIT in the office of Superintending Engineer, P.W. Circle, Amravati. after the online submission of Proposal on Dt. 13.07.2020 at 10.00 Hrs. to Dt. 15.07.2020 @ 17.30 Hrs. hours. |
| 4 | Bid Opening Date | Dt. 16.07. 2020 at 10.00 Hrs. in the office of Superintending Engineer, P.W. Circle, Amravati. (If Possible) |

The Tender can be downloaded from **www.mahatenders.in.** The Schedule of submission mentioned in the e-tender notice should be strictly adhered to.
Address in case of any Communication,
Executive Engineer, Public Works Division,
Achalpur Camp Achalpur, Distt. Amravati 444805
Phone No. 07223-220260
Email: achalpur.ee@mahapwd.com

Sd/-
Executive Engineer
Public Works Division, Achalpur

डीजीआयपीआर/२०२०-२०२१/२९९


# चिनी ॲप्सना अमूल गर्लचाही जोरदार फटका





◆ **नवी दिल्ली, २ जुलै**

केंद्र सरकारने सुमारे ५९ चिनी ॲप्सवर बंदी आणली असतानाचा आता अमूल गर्लनेही आपल्या संदेशातून जोरदार फटका लावला आहे.

अमूल ही देशातील नामांकित डेअरी कंपनी असून, राष्ट्रीय तसेच जागतिक विविध विषयांवर वेळोवेळी संदेश प्रसारित करत असते. अमूल गर्ल कार्टूनवरील मथळे वा त्यांच्यावरील संदेश लोकप्रिय ठरले असून, अनेकदा चर्चेतही असते. सोमवारी भारत सरकारने भारतात मोठ्या प्रमाणात वापर केल्या जाणाऱ्या टिक टॉक, शीन, वी चॅट सारख्या ५९ चिनी मोबाईल ॲप्सवर बंदी घातली. हाच विषय घेत अमूलने आपल्या ट्विटरवर डूडल शेअर केले आहे. यात अमूलची मॅस्कॉट मुलगी रेफ्रिजरेटरसमोर लोणी घेऊन जाताना दिसत आहे. कॅप्शनमध्ये स्टिक विथ दिस स्टॉक. वीचॅट ओव्हर टी.(अर्थ असा की या बटर स्टिकचा साठा राखला जावो. आम्ही चहावर बोलू.)

दरम्यान, देशाच्या सार्वभौमत्व, अखंडता आणि सुरक्षेबाबत धोका निर्माण होण्याच्या शक्यतांनी भारताने चिनी ॲप्सवर देशभरात बंदी आणली. गूगल प्ले स्टोअरवरूनही ती हटवण्यात आली आहे. काही वापरकर्त्यांच्या मते, त्यांना मंगळवारी काही काळ टिक टॉक वापरता आला. देशात या ॲप्सचे सुमारे २०० दशलक्ष वापरकर्ते होते, हे उल्लेखनिय. *(वृत्तसंस्था)*